# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २८२- २३** **दिनांक : - २४/०८/२०२३**

## "जुलै" महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) दिनांक ०९/०७/२०२३ रोजी फिर्यादी विकेश रामआशिष चौधरी, रा. नालासोपारा पुर्व यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, दिनांक ०९/०७/२०२३ रोजी दुपारी ०४.१२ वा.च्या सुमारास फिर्यादी व त्यांचा मित्र रोहित राजेश यादव असे त्यांचे मोटारसायकलवरुन नालासोपारा पश्चिमकडुन नालासोपारा पुर्वेकडे त्यांचे घरी जात असताना नालासोपारा ओव्हरब्रिजवर त्यांचे दुचाकीचा आरसा समोरील स्कुटरवरील इसमास लागल्याने सदर गोष्टीचा राग मनात धरुन स्कुटरवरील अनोळखी तीन इसमांनी फिर्यादीस चेहऱ्यावर व त्यांचा मित्र नामे रोहीत राजेश यादव यास हाताने चेहऱ्यावर, डोकयावर तसेच छाती आणि पोटावर मारहान केल्याने सदर मारहाणीत रोहीत राजेश यादव याचा मृत्यु झाला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ३४१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३०२, ३२३, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये सदर घडलेल्या गंभीर घटनेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. सदर गुन्हा करणारे आरोपीत हे अनोळखी असल्याने त्यांचेबाबत काहीएक माहिती उपलब्ध नव्हती. सदर गुन्हेबाबत तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) निलेश गंगाधर पुजारी, २) पंकज अशोक बोरीचा, ३) निलेश रायसाहेब सिंग, सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर अरोपीत यांना दिनांक १०/०७/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हा घडल्यानंतर ०८ तासांच्या आत गुन्हा उघड करण्यात नालासोपारा पोलीसांना यश आले आहे.

सदरची कामगिरी करणारे नालासोपारा पोलिस ठाणेचे वपोनि विलास सुपे, पो.नि. श्री.राहुल सोनावणे (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर,पो.उप.निरी.अख्तर शेख,म.पो.उप.निरी. भाविका माहीमतुरा, स.फौ. मंगेश चव्हाण, पो.हवा. किशोर धनु, हिरालाल निकुंभ, पो.ना. अमोल तटकरे, पो.अंम. राजेश नाटुलकर, प्रेम घोडेराव, जगदीश बोरसे, जगदाळे, पो.हवा. ढोणे ( नेमणुक- पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ३, विरार), म.सु.ब. सागर तिरमले, पवन कदम यांचा दिनांक २४/०८/२०२३ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **" जुलै महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि.श्री. विलास सुपे

२) वालीव पोलीस ठाणे हद्दीत दि. ३१/०८/२०२२ रोजी रात्री १२.०० वा. ते सकाळी ०४.०० वा.चे दरम्यान मांडवादेवी वसाहत वालीव फाटा वसई पुर्व येथील फिर्यादी यांचे राहते घरातुन सोन्याचे दागिणे, मोबाईल व रोख रक्कम असा एकुण ४६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी झालेबाबत अज्ञात आरोपी विरुध्द फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलिस ठाणेत गुन्हा नोंद क्र. ८८१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वालीव पोलिस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रीक विश्लेषणाव्दारे मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) राजु कैलास जैस्वाल, रा. कृष्णानगर, गौराईपाडा वसई पुर्व २) अजीत संदीप साहु, रा. आचोळा डोंगरी झोपडपट्टी, नालासोपारा पुर्व, ३) सौ. शिला कैलास जैस्वाल, रा. कृष्णानगर गौराईपाडा वसई पुर्व, ४) नवनीत दिलीप विश्वकर्मा ऊर्फ रावण, रा. जिवननगर, बिलालपाडा नालासोपारा पुर्व यांना ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत यांनी वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याचे निष्पन्न झल्याने त्यांना सदर गुन्हात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीत यांचेकडे अधिक तपास केला असता अटक आरोपती यांनी वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील एकुण १६ गुन्हे व पेल्हार पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील १ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न करुन त्यांचेकडुन १७ गुन्हयातील एकुण **५,५१,६०८/-** रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी करणारे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोनि श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे),सपोनि ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ जुलै महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना तत्कालीन वपोनि श्री. कैलास बर्वे

३) दिनांक ०३/०४/२०२३ रोजी मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील दीप सागर दुकानाचे मालक नामे सागर रोहिदास काळे, रा. सहकार प्रीमिअर, कनकिया रोड मिरारोड पुर्व हे दुकानात असतांना एक इसम त्यांचे दुकानात येवुन तो टाटा कॅपीटल बॅंकेचा कर्मचारी असल्याचे सांगुन बिझनेस लोन मंजुर करुन देतो असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांचेकडुन एच.डी.एफ.सी बॅंकेचे कॅन्सल चेक घेवुन सदर कॅन्सल चेक फिर्यादी यांचे एच.डीएफसी बॅंकेत वटवुन फिर्यादी यांची एकुण ०१,१८,०००/- रुपये किंमती फसवणुक केलेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. १२७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०,४६५,४६८,४७१,३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील आरोपीतांनी वापरलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण केले असता सदर गुन्हयातील आरोपी हे एक मोबाईल नंबर फक्त दोन ते तीन दिवस गुन्हा करणेसाठी वापरत असल्याने निदर्शनास आल्याने सदर आरोपी यांचा शोध घेणे जिकरीचे झाले होते. नमुद गुन्हयातील आरोपी यांनी वापरलेले मोबाईल क्रमांक व त्यातुन मिळालेले मोबाईलचे आयएमईआय क्रमांकावर पाळत ठेवली असता दिनांक १४/०६/२०२३ रोजी नमुद गुन्हयातील आरोपी हे अहमदनगर याठिकाणी गुन्हे करण्याच्या तयारीत असल्याची निदर्शनास आले व सदर आरोपी पळुन जावुन नये म्हणुन आरोपीबाबत अहमदनगर येथील स्थानिक दुकानदारास माहिती देवुन स्थानिक पोलीस ठाणेच्या मदतीने आरोपीतांना पकडण्यात आले. सदर गुन्हयात आरोपी नामे १) मोहम्मद अब्दुल कुद्दुस मेहबुब, रा. उर्दु शाळेजवळ, ता. लखना, जि. हजारीबब, राज्य झारखंड २) एतेशाम एमडीनईम आलम,रा. ३०/२४, ईचारण, घोसलाई, कोलकत्ता ३) अजीज लतीफ शेख, रा. २८/ए, मोमीनपुर रोड, कोलकत्ता ४) मुकेशकुमार दुर्याधन नायक, रा. २३४/ एसीजी बोस रोड, कोलकत्ता, प. बंगाल ५) गंगा लक्ष्मी साहु, रा. सोनारपुर, २४ परगाना, कोलकत्ता यांचा मिरारोड पोलीस ठाणेत दाखल असलेल्या वर नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १८/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आले होते. नमुद अटक आरोपी यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी गेले एक ते दीड वर्षापासुन अशा प्रकारचे गुन्हे मिरा, भाईंदर, वसई, विरार, मुंबई, नवी मुंबई, पुणे शहर, अहमदनगर, नाशिक, नागपुर तसेच तेलंगणा व सुरत गुजरात राज्यात केले असल्याची माहिती मिळाली आहे. सदर आरोपीतांकडुन आणखी ०४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयसिंह बागल, स.पो.नि. शिवकुमार गायकवाड, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. हनिफ शेख, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ. प्रशांत महाले, पो.हवा. प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, पो.अंम. शंभु शेळके, अथर्व देवरे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"जुलै महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. विजयसिंह बागल

४) शिक्षा बंदी आरोपीत क्रमांक ६३८४ सैय्यद आफताब अहमद हसन रा. ७०१ गौरव गॅलेक्शी फेज-२, डी विंग मिरारोड पुर्व यास बोरीवली रेल्वे पोलीस स्टेशन, मुंबई गु.र.नं. २३१/२००० भादविवस कलम ३०२, ३४ या गुन्हयांत मा. शहर सत्र न्यायालय, मुंबई यांनी जन्मठेपेची शिक्षा दिलेली आहे. आरोपीत हा दिनांक ११/०६/२००७ रोजी पासुन नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. आरोपीत याची दिनांक २१/११/२०१४ ते दिनांक ०६/१२/२०१४ पावेतो १४ दिवसांच्या संचीत रजा मंजुर करण्यात आलेली असुन तो नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथुन रजेवर होता. त्यास काशिमीरा पोलीस ठाणे येथे हजेरीचे ठिकाण देण्यात आलेले होते. तो कारागृहामध्ये वेळेत हजर न झाल्याने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं. I ४९२/२०१४ भादविस २२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा मार्फत दाखल गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना, पो.अंम/प्रशांत विसपुते यांना मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत सैय्यद आफताब अहमद हसन हा हुसैन टेकरी जावरा, रतलाम मध्यप्रदेश येथे आला असुन व तो तेथुन इतरत्र कोठेतरी निघुन जाणार असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीवरुन श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांनी पोलीस अधिक्षक रतलाम श्री शिध्दार्थ बहुगुणा यांचेशी संपर्क साधुन आरोपीत याचा शोध घेण्यास विनंती केली होती. गुन्हे शाखा-१ चे सपोनि/ पुषराज सुर्वे, पो.हवा/पुष्पेंद्र थापा, पो.हवा/समिर यादव, पो.अंम/प्रशांत विसपुते असे तपास पथक आरोपीत सैय्यद आफताब अहमद हसन याचा ताबा घेण्यासाठी मध्यप्रदेश राज्यात रवाना केले होते.

मध्यप्रदेश राज्यात पाठविण्यात आलेल्या तपास पथकाने आरोपी १) सैय्यद आफताब अहमद हसन ऊर्फ नबी अहमद हसन ऊर्फ इरफान मेहदी मुळ रा. दहीयावर सुरापुर तांडा, तह. अलिगढ, जि.

आंबेडकर नगर, राज्य उत्तर प्रदेश, यास जावरा जिल्हा रतलाम मध्यप्रदेश येथे दिनांक १९/०७/२०२३ रोजी १६.३० वाजता ताब्यात घेतले असुन आरोपीत याचा मा. प्रथम वर्ग न्यायीक मॅजिस्ट्रेट, जावरा जिल्हा रतलाम (मध्य प्रदेश) यांचे न्यायालयातुन ट्रान्झीस्ट रिमांड घेवुन आणण्यात आले होते.

सदरची कामगिरी करणारे श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पो.नि./अविराज कुराडे, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, पुषराज सुर्वे, स.फौ.राजु तांबे, पो.हवा./पुष्पेंद्र थापा, समिर यादव,संतोष लांडगे, सचिन हुले,संदिप शिंदे,पो.अंम/प्रशांत विसपुते,मसुब किरण आसवले यांचा **“जुलै महिन्यातील उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड” क्रमांक-१** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. अविराज कुराडे

५) दिनांक १७/०७/२०२३ रोजी वसई पोलीस ठाणे हद्दिमध्ये पुष्कर अपार्टमेंट बाभोळा येथे सायंकाळी ०५:०० वा.चे सुमारास चांदीचे दागिणे चोरी झाल्याबाबत फिर्यादी नामे समिता विश्वास मोरे,रा.बाभोळा,वसई,पश्चिम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.क्रं २२०/२३ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मागील काही दिवसामध्ये वसई पोलीस ठाणे हद्दिमध्ये घरफोडी व चोरीच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याने सदर गुन्हयांना आळा घालून दाखल गुन्हयांची लवकरात लवकर उकल करण्यासाठी वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने दोन पथके तयार करून गुन्हयाचा तपास चालू होता.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाद्धारे आरोपी नामे राकेश राजेश मस्तान यास ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत याने वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात दिनांक २३.०७.२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडे केलेल्या तपासा दरम्यान त्याने वसई व माणिकपुर पोलिस ठाणे कार्यक्षेत्रात ६ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्याच्या कडुन चांदीचे दागिणे, मोबाईल, लॅपटॉप, टॅब, कॅमेरा असा एकुण ६९,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे वसई पोलिस ठाणेचे वपोनि. रणजित आंधळे, सपोनि. राम सुरवसे, सुनिल पवार, पो.हवा. सुनिल मलावकर, मिलींद घरत, पो.अं. सुर्यकांत मुंढे, अक्षय नांदगावकर,अमोल बर्डे यांचा **"जुलै महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड " क्रमांक-२** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना व.पो.नि. श्री. रणजित आंधळे

६) वालीव पोलीस ठाणे हद्दीत दि. २९/०६/२०२२ रोजी पहाटे पहाटे ०४.०० वाजता ते ०५.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी शबीर अहमद सिद्दिकी वय ४० वर्ष धंदा-भंगार दुकान, रा. घर नं ४६०, पथरपाडा, मालजीपाडा, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे त्यांचे घरामध्ये झोपलेले असताना अज्ञात ४ ईसमांनी त्यांचे दुकानाचे दरवाजाची कडी उघडुन घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादी यांना झोपेतुन उठवुन त्यांचेपैकी एका ईसमाने फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन "तुझ्याकडील पैसे दे" अशी धमकी देवून त्यांच्या उशाखाली ठेवलेला वन प्लस कंपनीचा मोबाईल आणि रोख रक्कम असा एकुण २०,६००/- रुपये रक्कमेचा ऐवज चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रं. ६४४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३९२, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाद्धारे सापळा रचुन आरोपीत १) अभय उर्फ बिल्ला उर्फ प्रिन्स विजेश शुक्ला, रा. बाप्पा सिताराम चाळ, रुम नं -१, बाप्पा सिताराम मंदिराचे बाजुला, तुंगारेश्वर फाटा, वसई व २) आरीफ महोम्मद सिद्दिकी रा.गणेशनगर चाळ, गल्ली नं -२,तुंगार फाटा, सातिवली,वसई पुर्व यांना ताब्यात घेण्यात घेवुन त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशीकरिता केली असता त्यांनी सातिवली गावदेवी मंदिर आणि काठीयावाडी ढाबा, तुंगारफाटा या ठिकाणांवर अंधारात उभे राहून एकटयाने पायी चालत प्रवास करणा-या व्यक्तींना हेरुन त्यांना चाकुचा धाक दाखवुन मारहाण करुन त्यांचेकडील पैसे व मोबाईल चोरी केले बाबतचे आचोळे व वालीव पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील एकुण ४ गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

तसेच नायगाव पोलिस ठाणे गुन्हा नोंद क्रं. १७७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हयातील आरोपीतांचा तपासादरम्यान गुप्त बातमिदाराकरवी मिळालेल्या माहीतीवरुन आणि मोबाईलचे तांत्रिक विश्लषणाव्दारे शोध घेवून सापळा रचुन आरोपीत जिग्नेश पोपट चित्ते रा. १६११, आदर्शनगर,

सोळसुंबा, वलसाड राज्य गुजरात यास ताब्यात त्याचेकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशीकरिता केली असता असता सदर आरोपीत याने वर नमुद गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

असे जबरी चोरीचे ४ आणि उघडयावरुन चोरीचा १ असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणुन त्यांचे ताब्यातुन २,०१,०००/- रुपये किंमतीचे १५ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौ.रमेश भोसले,संजय नवले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील,चंदन मोरे,सचिन पाटील, जगदिश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सायबर शाखेचे सहा.फौ.संतोष चव्हाण यांचा **"जुलै महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-३ देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.




मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि. श्री. शाहुराज रणवरे

७) भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२/०६/२०२३ रोजी तक्रादार नामे डॉ. सचिन दुग्गड, रा. गंगापुर रोड, नाशिक हे डॉ. अमोल जाधव यांचे डॉ. माधवी हेल्दी स्माईल डेन्टल क्लिनीक, पुष्प निकेतन, मॅक्सेस मॉलचे पाठीमागे, भाईंदर प. येथे हॉस्पीटलमध्ये दातांचे सर्जरीसाठी त्यांचाकडील सर्जरीसाठी उपयोगात येणाऱ्या साधनांसह त्यांची सफेद रंगाची कार क्रमांक एम.एच-१५ बी.एक्स. ४२६० हिचेमधुन आले होते. त्यानंतर रात्री १०.०० वा. चे सुमारास डॉ. सचिन दुग्गड हे डॉ. माधवी हेल्दी स्माईल डेन्टल क्लिनीक येथे सर्जरी पुर्ण करुन परत जात असतांना त्यांनी त्यांचे डेन्टल सर्जरी साठी उपयोगात येणारे ३५ लाख रुपये किंमतीचे सामान डॉ. माधवी हेल्दी स्माईल डेन्टल क्लिनीकमध्ये काम करणारी महिला नामे धनश्री शिर्के हिला त्यांची कार क्रमांक एम.एच-१५ बी.एक्स.४२६० हिचेमध्ये ठेवण्यासाठी दिले होते. धनश्री शिर्के यांनी नजरचुकीने सदरचे सामान त्यांचा कारसारख्या दिसणाऱ्या सफेद रंगाच्या कारमध्ये ठेवले होते. सदरबाबत भाईंदर पोलीस ठाणेत मालमत्ता गहाळ रजि. क्र. १७५५३/२०२३ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती.

नमुद गहाळ मालमत्तेची किंमत ३५ लाख रुपये असल्याने नमुद मालमत्तेचा शोध घेणेकामी पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, मिरारोड विभाग यांनी आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस

ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथक व भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी संयुक्तरित्या नमुद गहाळ मुद्देमालाचा शोध घेत होते. नमुद गहाळ मालमत्तेच्या घटनास्थळाचे तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुचे अंदाजे ५५ सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यांचे सीसीटीव्ही फुटेज तपासुन कार क्रमांक एम.एच.-०१ ए.सी.७०६९ हिचा शोध घेवुन कारमालक नामे श्री दिपक शिवप्रसाद अग्रवाल, रा. रुम नंबर १६०२, तिरुपती हाईट्स, फायरबिग्रेड ऑफीसचे जवळ, महेश्वरी रोड, भाईंदर प. ता.जि. ठाणे यांचे कारचे डिक्कीतुन सदरचे सामान हस्तगत करण्यात आले आहे. डॉ. सचिन दुग्गड यांनी कार तसेच दिपक शिवप्रसाद अग्रवाल यांचे कारचा रंग मिळता-जुळता असल्याने तसेच नमुद दोन्ही कार ह्या आजुबाजुस उभ्या केलेल्या असल्याने धनश्री शिर्के यांनी सदरचे सामान गैरसमजुतीने दिपक शिवप्रसाद अग्रवाल यांचे कार क्रमांक एम. एच.-०१ ए.सी. ७०६९ हिचेमध्ये ठेवले होते. तरी नमुद गाहाळ मालमत्तेचा शोध नुमद मुद्देमाल तक्रारदार नामे डॉ. सचिन दुग्गड, रा. गंगापुर रोड, नाशिक यांना स्वाधीन करण्यात आल्याने तक्रारदार यांनी तपास पथकाचे आभार व्यक्त केले आहे.

सदरची कामगिरी करणारे नवघर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय पवार, स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.नि. अभिजित लांडे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अंम. सुरजसिंग घुनावत, ओंकार यादव,जाधव तसेच भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.फौ. अर्जुन जाधव, पो.अंम. संजय चव्हाण, गजानन चव्हाण यांचा **"जुलै महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड" क्रमांक-४** देवुन **मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. विजय पवार

---ooo---